सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

अल्पसंख्याक विकास विभाग,

रुम नं.७१५, ७ वा मजला (विस्तार),मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

(दूरध्वनी क्र.०२२-२२८३२२३७) (ई-मेल : desk4.mdd-mh@gov.in)

क्रमांक : वक्फ २०२५/प्र.क्र.२४६/का.४ दिनांक : ११ .१२.२०२५.

प्रति,

प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधानभवन, मुंबई.

विषय : महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचे सन २००२-०३ ते २०१७-१८ या कालावधीतील लेखा परिक्षण अहवाल विधिमंडळास सादर करणेबाबत

महोदय,

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचे सन २००२-०३ ते २०१७-१८ चे लेखापरिक्षण अहवाल सोबत जोडले आहेत.

२. भारत सरकारने वक्फ अधिनियम, १९९५ हा कायदा पारीत करुन संपूर्ण देशात लागू केला. सदर कायदा महाराष्ट्र राज्यात दि.०१/०१/१९९६ पासून लागू करण्यात आलेला असून या कायद्यातील तरतुदींनुसार शासन अधिसूचना, महसूल व वन विभाग, क्र.वक्फ-१०/२००१/प्र.क्र.१५४/ल-३, दि.४ जानेवारी, २००२ अन्वये पनचक्की, औरंगाबाद येथे मुख्यालय असलेल्या महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाची स्थापना करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या स्थापनेपासून म्हणजेच सन २००२-०३ ते २०१७-१८ वर्षाचे लेखा परिक्षण अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवावयाचे प्रस्तावित आहे.

३. सदर अहवाल विधानमंडळाच्या पटलावर ठेवण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणमिमांसा महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाने सादर केली असून ती पुढीलप्रमाणे आहे-

१) अल्पसंख्याक विकास विभागाची स्थापना फेब्रुवारी, २००८ मध्ये झाली आहे त्यापूर्वी महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ हे महसूल व वन विभागाच्या अखत्यारित होते. विभागाची स्थापना झाल्यानंतर वक्फ मंडळ अल्पसंख्याक विकास विभागाकडे हस्तांतरित करण्यात आले आहे.

२) महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या स्थापनेपासून सलग मोठ्या कालावधीसाठी नियमित मुख्य कार्यकारी अधिकारी उपलब्ध झालेले नाहीत.

३) महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाकडे प्रशिक्षित लेखापरिक्षक उपलब्ध झालेले नव्हते. वक्फ मंडळाकडे प्रशिक्षित अधिकारी/कर्मचारी उपलब्ध नव्हते. वक्फ मंडळाकडे वर्ग-३ चे केवळ २२ आणि वर्ग -ड चे ९ असे एकूण ३१ कर्मचारी कार्यरत होते. या कर्मचाऱ्यांच्या सहाय्याने वक्फ मंडळाच्या अखत्यारितील संपूर्ण महाराष्ट्रातील स्थानिक वक्फ मालमत्तेचे संरक्षण करणे, विकास करणे तसेच हजारो वक्फ संस्थांच्या व्यवस्थापन समित्यांचे तंटे सोडविणे व त्यावर नियंत्रण ठेवणे, इ. कामे करण्यात येत होती.

४) महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाकडे अद्ययावत लेखे ठेवण्यासाठी संगणकीय सॉफ्टवेअर उपलब्ध नव्हते.

४. वक्फ अधिनियम, १९९५ चे कलम ८० व ८१ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचे सन २००२-०३ ते २०१७-२०१८ चे वार्षिक अहवाल दोन्ही सभागृहाच्या पटलावर ठेवणे आवश्यक आहे. तरी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचे सन २००२-०३ ते २०१७-२०१८ या आर्थिक वर्षांचे वार्षिक लेखापरिक्षण अहवाल वक्फ अधिनियम, १९९५ च्या कलम ८१ मधील तरतुदीनुसार, सभागृहाच्या पटलावर ठेवण्यासाठी कृपया मान्यता द्यावी, ही विनंती.

आपला,

(मिलिंद शेणॉय)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

सोबत: लेखा परिक्षण अहवाल (पुस्तक व पेनड्राईव्ह.)

प्रत,

कार्यासन-४, संग्रहार्थ.